देशोन्नती दि 18/09/23

# चोरी गेलेली दुचाकीचा दोनच दिवसात पो.नि. दिपक बोरसे यांनी लावला छडा



देशोन्नती वृत्तसंकलन...

**किनवट** ■ शहरातील एस.व्ही.एम कॉलनी येथून चोरीला गेलेल्या दुचाकीचा किनवट पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपक बोरसे यांनी दोनच दिवसात छडा लावला असून तेलंगणा राज्यातील बाजार हातनूर येथून त्यांनी मोठ्या शिताफिने दुचाकी जप्त करुन न्यायालयीन प्रक्रिया नंतर १७ सप्टेंबर रोजी किनवट पोलिसांनी सदर दुचाकी मूळ मालकाच्या स्वाधीन केली आहे. दुचाकी चोरट्याविरुद्ध किनवट पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईबद्दल नागरिकाकडून कौतुक केले जात आहे.

किनवट शहरातील एसव्हीएम परिसरात राहणारे आंतरोश किशन पेटकुले यांची हिरो कंपनीची पॅशन-प्रो दुचाकी चोरीला गेली होती. याप्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल झाल्यानंतर पोलीस निरीक्षक दीपक बोरसे यांनी दुचाकी चोरट्याविरुद्ध कारवाई सुरू केली व तेलंगणा राज्यापर्यंत तपासाची चक्रे गतीने फिरवून घटनेच्या दुसऱ्या दिवशी बाजार हातनूर येथून दुचाकी जप्त केली. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १७ सप्टेंबर रोजी पोलीस निरीक्षक दीपक बोरसे यांनी सदर मोटरसायकल मूळ मालक आंतरोश किशन पेटकुले यांना स्वाधीन केली आहे. याप्रसंगी बिट जमादार तुकाराम वाडगुरे युवा उद्योजक अभय नगराळे व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. किनवट पोलिसांच्या या कार्यवाहीमुळे दुचाकी चोरट्यांचे धाबे दणाणले आहेत. (ता.प्र.)